


# करु आरोग्याची साथ!

## भाग - २

डॉ. अनंत फडके

डॉ. अमिता पित्रे

डॉ. अभय शुक्ला

साथी केंद्र, सहत

# करू आरोग्याची साथ!

**आरोग्यसाथीं साठी प्रशिक्षण पुस्तक**

**भाग २**

**डॉ. अनंत फडके**

**डॉ. अमिता पित्रे**

**डॉ. अभय शुक्ला**

**संपादन सहाय्यः डॉ. समीर मोने**

SATHI
Support for Advocacy & Training to Health Initiatives
(Action Centre of Anusandhan Trust)

**प्रकाशक :** साथी-सेहत,
फ्लॅट नं. ३ व ४, अमन(ई) टेरेस,
प्लॉट नं. १४०, डहाणुकर कॉलनी,
कोथरूड, पुणे- ४११ ०२९
**फोन :** (०२०) २५४५१४१३/२५४५२३२५
e-mail : cehatpun@vsnl.com

**चित्रांकन :** श्री चंद्रशेखर जोशी
**अक्षर जुळणी :** दत्तात्रय तरस, शारदा महल्ले
**पहिली आवृत्ती :** १ डिसेंबर २००४
**पुनर्मुद्रण :** २६ जानेवारी २००७,
गणराज्य दिन

**मुद्रण : बालोद्यान प्रेस, पुणे**

**देणगी मूल्य :** १२० रु.




# या पुस्तकाबद्दल थोडेसे....

'करू आरोग्याची साथ' या पुस्तकाचा दुसरा भाग तुम्हा आरोग्य साथींच्या हातात ठेवतांना आम्हाला खूप आनंद होत आहे. या पुस्तकाच्या पहिल्या भागाच्या सुरवातीला या पुस्तकाचा उद्देश, वैशिष्ट्ये, रूपरेषा हे थोडक्यातमांडले होते. दुसऱ्या भागाचा वापर करायच्या आधी पुन्हा हे मुद्दे तुम्ही वाचावेत म्हणून ते परत खाली देत आहोत.

**हे पुस्तक कशासाठी?**

आपल्याला सर्वांना माहीत आहे की एकविसावे शतक उजाडू लागले तरी अजूनही भारतातील खेड्या-पाड्यांमध्ये योग्य आरोग्य-सेवा मिळत नाही. ती मिळायची असेल तर सध्याच्या परिस्थितीत किमान एवढे तरी झाले पाहिजे की त्या त्या गावात राहणाऱ्या सुयोग्य व्यक्तींना प्रशिक्षण देऊन त्यांच्यामार्फत कायम गावातच उपलब्ध असणारी प्राथमिक आरोग्य-सेवा दिली जाईल. खरं तर अनेक साध्या आजारांचे निदान, उपचार करायला डॉक्टरची गरज नसते. गेल्या सुमारे चाळीस-पन्नास वर्षात जगात ठिकठिकाणी व भारततही झालेल्या प्रयोगांवरून हे स्पष्ट झाले आहे. निरनिराळ्या आरोग्य संस्थांमार्फत अनेक ठिकाणी ग्रामीण आरोग्य कार्यकर्त्यांचे चांगले काम चालू आहे. मात्र कमी शिक्षण झालेल्या अशा आरोग्य कार्यकर्त्यांसाठी योग्य प्रशिक्षण पुस्तके फारशी नाहीत.

मर्यादित पण योग्य प्रशिक्षण दिले तर असे आरोग्य-कार्यकर्ते प्राथमिक आरोग्य सेवेची अनेक कामे चांगल्या तऱ्हेने करू शकतात असा अनेकांचा अनुभव आहे. साधारणपणे पाचवी किंवा अधिक शिक्षण घेतलेल्यांना असे प्रशिक्षण घ्यायला उपयोगी पडावे यासाठी हे पुस्तक आहे. प्रशिक्षणात सांगितलेले मुद्दे नीट समजायला व लक्षात रहायला मदत व्हावी अशा बेताने हे पुस्तक बनवले आहे. अर्थातच केवळ हे पुस्तक वाचून प्रशिक्षण होणार नाही. प्रशिक्षक व इतर सामुग्रीच्या मदतीने पध्दतशीर प्रशिक्षण त्यासाठी घ्यावे लागेल.

**पुस्तकाची काही वैशिष्ट्ये**

शाळेत मिळणारे शिक्षण व या पुस्तकामार्फत तुम्हाला मिळणारे प्रशिक्षण यात महत्वाचा फरक आहे. विद्यार्थ्यांची सर्वसाधारण बौध्दिक क्षमता वाढवणे व काही किमान ज्ञान, दृष्टिकोन देणे असा शाळेतील शिक्षणाचा हेतु असतो. तर व्यवहारात उपयोगी पडणारे ज्ञान व कौशल्ये मिळावीत असा प्रशिक्षणाचा हेतु असतो. त्यामुळे हे पुस्तक लिहतांनाही व्यवहारात उपयोगी पडेल अशी शास्त्रीय माहिती देण्यावर भर दिला आहे. बऱ्याचशा धड्यांच्या शेवटी 'हा धडा शिकल्यानंतर आपल्याला हे करता येईल' या शीर्षकाखाली कौशल्यांची यादी उजळणी

करण्यासाठी दिली आहे. ही कौशल्ये शिकवण्याच्या दृष्टीने हे धडे बेतले आहेत. उदाहरण म्हणजे - जुलाब, ताप इत्यादी नेहमीच्या लक्षणांमागचे नेहमीचे साधे आजार ओळखून त्यावर उपचार करणे हे नवे कौशल्य तुम्ही शिकावे यासाठी काही धडे आहेत. हे शिकण्यासाठी ज्या माहितीचा तुम्हाला उपयोग नाही अशी माहिती देण्याचा मोह टाळला आहे. अनावश्यक माहितीचा बोजा तुमच्यावर पडू नये हा यामागचा हेतु आहे. आपल्या शाळेतील शिक्षणात असा अनावश्यक तपशीलांचा किंवा जीवनाशी तुटलेल्या ज्ञानाचा बोजा विद्यार्थ्यांवर अनेकदा टाकला जातो. त्यामुळे ते शिक्षण कंटाळवाणे वाटते. या उलट या पुस्तकात दिलेली माहिती रोजच्या आयुष्याशी संबंधित असल्याने प्रशिक्षण घेताना कंटाळा येणार नाही. तसेच तुम्हाला वारंवार उपयोगी पडणारे, वापरावे लागणारे असे हे ज्ञान आहे. त्यामुळे तुम्ही जसे काम करत जाल तसे तुम्ही हे ज्ञान आत्मसात करत जाल.

विषय शक्य तितका सोपा करून सांगण्याचा आम्ही या पुस्तकात प्रयत्न केला आहे. तसेच भाषाही सोपी, सहज समजेल अशी असावी असा प्रयत्न केला आहे. सोबत रेखाचित्रांचाही उपयोग केला आहे. मुद्यांना उठाव यावा, गुंतागुंतीचा वाटणारा मुद्दा समजायला मदत व्हावी, तसेच पुस्तक आकर्षक वाटावे यासाठी चित्रे वापरली आहेत. अर्थात आम्हाला हे कितपत जमले आहे हे तुम्ही वाचकांनीच ठरवायचे आहे.

प्रत्येक धड्यात एक व्यंगचित्र घातले आहे. त्यात मांजर व उंदीर यांच्यात संभाषण चालते. मनीमाऊ शिष्टपणे काही तरी टीका करते. त्यातून पारंपरिक, प्रस्थापित दृष्टिकोन व्यक्त होतो. तर उंदराने दिलेल्या उत्तरावरून सामान्य माणसाची बाजू व शास्त्रीय दृष्टिकोन पुढे येतो. हे संवाद तुम्हाला आवडतील, पुस्तक अधिक वाचनीय बनवतील अशी आशा आहे.

एका बाजूला अनावश्यक माहिती टाळायची तर दुसऱ्या बाजूला नुसते हे करा, ते करा एवढेच न सांगता त्यामागील शास्त्रीयता समजावून द्यायची अशी दोन्ही पथ्ये पाळत हे पुस्तक लिहले आहे. त्यात कितपत यश आले आहे ते वाचकांनीच ठरवायचे आहे!

प्रशिक्षण म्हणजे काही नुसती माहिती, कौशल्ये मिळवणे नव्हे. त्यामुळे आरोग्याबाबतचे हे प्रशिक्षण घेतांना आरोग्य, उपचार, समाज याकडे बघायची तुम्हाला एक दृष्टि मिळावी हाही आमच्या प्रशिक्षणाचा हेतु असतो. या पुस्तकातील दोन्ही भागांचा आवाका, त्यातील मांडणी पहाता तुमच्या लक्षात येईल की आरोग्याचा किंवा आरोग्य सेवेचा प्रश्न म्हणजे केवळ इंजेक्शन, गोळी, डॉक्टर यांची उपलब्धता असण्याचा प्रश्न नाही. त्याला इतर अनेक सामाजिक पैलू आहेत. आरोग्यासाठीची लढाई ही केवळ रोगजंतुंविरोधी लढाई नाही तर अज्ञान, गरिबी, पिळवणूक, फसवणूकीच्या विरोधातही ही लढाई आहे.

**या पुस्तकाची रूपरेषा**

हे प्रशिक्षण झाल्यावर तुमच्या गावात, वस्तीत तुम्ही प्राथमिक आरोग्य सेवेचे काम करू शकाल. प्राथमिक आरोग्य सेवेचे अनेक पैलू आहेत. त्यात नेहमीच्या साध्या आजारांचे निदान व सुरूवातीचे उपचार याला जसे महत्व आहे तसेच या आजारांबाबत आरोग्य शिक्षण करणे हेही महत्वाचे आहे. संधीवात, टी.बी. यासारख्या चिवट, गंभीर आजारांच्या बाबतीत तर सल्ला देणे, आरोग्य-शिक्षण करणे हेच काम तुम्हा आरोग्य साथींना करायचे आहे. तसेच अनेक आरोग्य-प्रश्न असे आहेत की ज्याबाबत गोळ्या-औषधांचा उपचार उपयोगी पडत नाही तर लोकांमध्ये

त्याबाबत आरोग्य-जागृती करण्याची गरज असते. उदाहरण म्हणजे दारू-तंबाखुच्या व्यसनांचे दुष्परिणाम, स्त्रियांचे खास आरोग्य-प्रश्न, कुपोषण, सरकारी आरोग्य सेवा नीट काम न करणे इत्यादी प्रश्नांवर आरोग्य-जागृती करणे हाच खरा उपाय आहे. एवढेच नाही तर आजार टाळण्यासाठी, आरोग्य सुधारण्यासाठी अन्न, पाणी, आरोग्यदायी वातावरण इत्यादी सोयी सर्वांना मिळायला हव्यात. त्यासाठी जनजागृती करणे व गरज पडली तर त्यासाठीच्या चळवळीत सामील होण, हेही करायला हवे. वरील सर्व कामे प्राथमिक आरोग्य सेवेत मोडतात. ती तुम्हाला शिकता यावीत या दृष्टीने निरनिराळे धडे लिहीले आहेत. पैकी या पुस्तकाच्या भाग -१ मध्ये आरोग्य, आजारपण, उपचार याबद्दल काही मूलभूत शास्त्रीय माहिती, तसेच काही साध्या आजारांचे निदान व उपचार (कुपोषण, रक्तपांढरी, जुलाब, ताप) यांचा समावेश आहे. तर प्रस्तुत भाग-२ मध्ये काही इतर साध्या आजारांसोबत (खोकला, जखम,पोटदुखी, प्रथमोपचार इत्यादी) वर दिलेल्या इतर विषयांवर धडे आहेत.

प्रत्येक धड्यामध्ये अनेक उपविभाग आहेत. या प्रत्येक उपविभागाचे तात्पर्य या उपविभागाच्या शेवटी एका चौकटीत दिले आहे. तसेच धड्याच्या शेवटी सर्व धड्याचा सारांश दिला आहे. कळीचे मुद्दे मनात भरावे म्हणून मुद्दाम ही उजळणी केली आहे. ही पुनरावृत्ती तुम्हाला उपयोगी वाटेल असा विश्वास आहे.

**आभार**

ठाणे जिल्ह्यात डहाणू-जव्हार तालुक्यात, कोल्हापूर जिल्ह्यात आजरा तालुक्यात, मध्यप्रदेशमध्ये बडवानी जिल्ह्यात निरनिराळ्या जन-आरोग्य-समित्यांनी 'आरोग्य-साथी कार्यक्रम' १९९५ ते १९९९ च्या दरम्यान सुरू केले. १९९८ पासून सेहतच्या 'आरोग्य साथी प्रकल्प' व २००२ पासून 'साथी केंद्र' या मार्फत या कार्यक्रमातील आरोग्य-साथींना प्रशिक्षण दिले जात आहे. त्यातील बहुसंख्य आरोग्य साथी बिन-शिकलेल्या आहेत. त्यांच्यासाठी बनवलेल्या आरोग्य-साथी भाग १ व भाग २ या चित्रमय पुस्तकांमधील मुद्दे काहीसे सविस्तर व खोलात या पुस्तकातील काही धड्यांमध्ये आहेत. अशा बिन-शिकलेल्या आरोग्य-साथींना प्रशिक्षण देताना विषय अगदी सोपा करून मांडण्याची जी पध्दत पडली त्याचा हे पुस्तक लिहीतांना खूप उपयोग झाला. तसेच गरीब डोंगरी संघटना, मासूम मधील बिन-शिकलेल्या व थोडे शिक्षण झालेल्या स्त्रियांना प्रशिक्षण देतांना झालेल्या अनुभवाचाही आम्हाला खूप फायदा झाला. या सर्व संस्था-संघटना व या सर्व आरोग्य-साथी यांचे आम्ही ऋणी आहोत. त्यांच्यामुळेच आम्हाला काम करायची स्फूर्ती मिळत राहिली. या आरोग्य साथींपैकी काहींना आम्ही विनंती केली की पुस्तक वाचतांना कुठे अडखळायला होते, ते त्यांनी हे धडे वाचून सांगावे. त्याप्रमाणे त्यांनी काही धडे काळजीपूर्वक वाचले व काही शब्द बदलायला सांगितले. पुस्तक सोपे, आवडीचे झाले आहे अशी दाद देऊन आमच्या उत्साहाला खतपाणी घातले. या सर्व आरोग्य-साथी व संस्था/संघटनांचे या सहकार्याबद्दल मनःपूर्वक आभार.

निरनिराळ्या आरोग्य-प्रकल्पांमध्ये ग्रामीण आरोग्य कार्यकर्त्यांना प्रशिक्षण देण्याचे काम चालू असते. पण विषय तेच असूनही या प्रशिक्षणाचे प्रमाणीकरण झालेले नाही. त्या दिशेने एक पाऊल टाकावे या हेतूने या पुस्तकात प्रमाणभूत शास्त्रीय माहिती वापरली आहे. तसेच या क्षेत्रात काम करणाऱ्या काही समविचारी डॉक्टर्सची मदत घेतली गेली आहे. त्यांना या पुस्तकाचा पहिला मसुदा पाठवून, एका बैठकीमध्ये त्यावर खोलात चर्चा करून मूळ मसुद्यात आशय व रूप या दोन्हीमध्ये बऱ्याच सुधारणा केल्या. या बैठकींमध्ये सामील झालेले डॉ. शाम

अष्टेकर, डॉ. ध्रुव मंकड, डॉ. मोहन देशपांडे, डॉ. दीप्ती चिरमुले, यांचे आम्ही मनःपूर्वक आभारी आहोत. 'आरोग्य साथी' प्रकल्प व 'साथी प्रकल्प' मधील आमच्या सहकाऱ्यांनी या प्रकल्पांच्या कामातील इतर वेगवेगळ्या जबाबदाऱ्या मनापासून सांभाळल्या. तसेच स्थानिक कामाची जबाबदारी डहाणू, आजरा व बडवानी येथील आरोग्य चळवळीच्या कार्यकर्त्यांनी समर्थपणे सांभाळली. आमच्या या सर्व सहकाऱ्यांमुळे आम्हाला या पुस्तकाच्या कामाकडे पुरेसे लक्ष देता आले. श्री. प्रशांत खुंटे यांनी भाग-१ मधील मजकूर अधिक सोपा करण्यासाठी अनेक सुधारणा सुचवल्या, काही गोष्टी, कविता, उंदीर-मांजर संवाद लिहून दिले. डॉ. समीर मोने यांनी भाग-२ चे शेवटचे प्रूफ सलग वाचून अनेक सुधारणा सुचवल्या व पुस्तक-छपाईचे नियोजन केले. आमच्या या सर्व सहकाऱ्यांचे मनःपूर्वक आभार.

चित्रकार श्री. चंद्रशेखर जोशी यांनी खास रस घेऊन सुबक चित्रे काढून दिली, आम्ही वेळोवेळी सांगितलेले बदल आपुलकीने करून दिले याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार. साथी-सेहत ऑफिसमधील श्री. दत्तात्रय तरस यांनी मजकूर टाईप करून दिला तर श्रीमती शारदा महल्ले यांनी मजकुराची सुबक मांडणी करणे हे काम कौशल्याने व आत्मीयतेने केले. आम्ही वारंवार केलेले बदल न कंटाळता अंमलात आणले. तसेच 'सेहत' मधील इतर सहकाऱ्यांनी वेळोवेळी संपूर्ण सहकार्य दिले. या सर्वांचे आम्ही मनःपूर्वक आभारी आहोत.

भारत-वैद्यक संस्था, लोकविज्ञान संघटना, आयडियल-निरोग, प्रयास या संस्थांच्या पुस्तकांमधील काही रेखाचित्रे, किंवा त्यातील कल्पना, फोटो यांचा समावेश या पुस्तकात आम्ही केला आहे. या मित्र संस्थांचे तसेच नोव्हिब ( NOVIB) च्या अर्थसहाय्याबद्दल त्यांचे आम्ही ऋणी आहोत. डॉ. विनय कुलकर्णी यांनी कातडीच्या आजाराची तर डॉ. आरती पळसुले यांनी डोळ्यांच्या आजाराची रंगीत चित्रे उपलब्ध करून दिली याबद्दलत्यांचे मनःपूर्वक आभार. डॉ. भूटानी यांच्या कलर ॲटलास ऑफ डरमॅटॉलॉजी या पुस्तकातून एक चित्र साभार घेतले आहे.

आरोग्य व आरोग्य सेवेपासून वंचित ठेवले गेलेले ग्रामीण कष्टकरी व या वंचितपणाला विरोध करणाऱ्या चळवळीत सामील झालेले आरोग्य साथी यांना आम्ही हे पुस्तक अर्पण करतो.

आम्हाला विश्वास आहे की या पुस्तकाचा तुम्ही पुरेपूर उपयोग कराल. तसेच या पुस्तकात सुधारणा करण्यासाठी आपल्या सूचना आम्हाला आवर्जून पाठवाल.




**डॉ. अनंत फडके** **डॉ. अमिता पित्रे**

**डॉ. अभय शुक्ला**

**साथी-सेहत, पुणे.**

**२६ जानेवारी २००७**
**गणराज्य दिन**

# या पुस्तकात वापरलेली चिन्हे व त्यांचे अर्थ

| | |
|---|---|
|  | चांगली स्थिति |
|  | खराब स्थिति |
|  | द्वाखान्यात न्या |
|  | जंतू |
|  | सैनिक पेशी |
|  | सकाळी, दुपारी, संध्याकाळी, रात्री |
|  | एक दिवस |
|  | पंधरा दिवस |
|  | विषाणु |
|  | जीवाणू |
|  | परजीवी जंतू |
|  | हे लक्षात ठेवा |
|  | याचा शोध घ्या |

# अनुक्रम


| | | पान क्रमांक |
|---|---|---|
| १. | खोकला | १ - १६ |
| २. | लहान मुलांमधला खोकला | १७ - २६ |
| ३. | पोटदुखी | २७ - ४९ |
| ४. | जखम | ५०-५६ |
| ५. | प्रथमोपचार | ५७-६९ |
| ६. | कातडीचे आजार | ७० - ८५ |
| ७. | डोळ्याचे आजार | ८६ - ९९ |
| ८. | आजारांची नोंद | १०० - ११० |
| ९. | आरोग्य साथीची वागणूक | १११ - ११८ |
| १०. | गंभीर चिवट आजार | ११९ - १४१ |
| ११. | एड्स् | १४२ - १५१ |
| १२. | मी बाई आहे म्हणून | १५२ - १६१ |
| १३. | दारु - तंबाखूमुळे आरोग्यावर होणारे दुष्परिणाम | १६२ - १७० |
| १४. | आरोग्यासाठी गावामध्ये सुधारणा | १७१ - १८७ |
| १५. | आरोग्य सेवेची व्यवस्था आणि आरोग्य अधिकार | १८८ - २०१ |

# 'साथी'

## ('सेहत' मधून विकसित झालेले 'अनुसंधान ट्रस्ट'चे कृति केंद्र)

आरोग्य व आरोग्य सेवा, विशेषतः प्राथमिक आरोग्य सेवा मिळणे हा जनतेचा हक्क मानला जावा यासाठी आरोग्य चळवळीत इतर समविचारी संस्था-संघटनांसोबत योगदान देण्याचे काम साथीकरते. १९९८ पासून अनुसंधान ट्रस्टच्या सेहत संस्थेचा कृतीगट म्हणून कार्यरत असणारा साथी संच, १ एप्रिल २००५ पासून अनुसंधान ट्रस्टचे कृति केंद्र म्हणून स्वतंत्रपणे कार्यरत आहे.

### आमचे स्वप्न

आम्हाला असा समाज अभिप्रेत आहे की ज्यामध्ये आरोग्य व आरोग्य सेवेचा अधिकार प्रत्यक्षात उतरला असेल... असा समाज की ज्यामध्ये-

✓ आरोग्याबाबत विषमता असणार नाही, बहुसंख्य गरीब व मागास समाजघटकांसह सर्वांना जगण्यासाठी आरोग्यवर्धक वातावरण व दर्जेदार आरोग्य सेवा मिळतील.

✓ असा समाज की ज्याने रोगकारक व नफांध विकासाचे प्रारुप नाकारले असेल व असे विकासाचे मार्ग अवलंबेल की ज्यात मानव व पर्यावरण दोहोंचे आरोग्य राखले जाईल.

✓ आरोग्य यंत्रणेमागे जनतेची फरफट होत नसेल, तर जनताच आरोग्य व्यवस्थेची चालक असेल व सर्वांना उपयोगी व प्रमाणित आरोग्य सेवांचा हक्क प्राप्त झाला असेल.

अशा समाजाचे लांब पल्ल्याचे ध्येय गाठण्यासाठीची रणनिति म्हणून साथीने आरोग्य विषयातील प्रशिक्षित कार्यकर्त्यांचा संच उभारला आहे. हा संच आरोग्य व आरोग्य सेवांचा मुलभूत मानवी हक्क प्रस्थापित करण्यासाठी विविध आंदोलने व विविध उपक्रम यांच्याशी सहकार्य करत आहे.

### आमचे उपक्रम-

**आरोग्य साथींमार्फत जनसंघटनांच्या सोबत प्राथमिक आरोग्य सेवेबाबत पथदर्शी काम**

● दूरवरच्या खेड्यापाड्यांमध्ये साध्या, नेहमीच्या आजारांवर सुरुवातीचा उपचार देण्याची व्यवस्था जनसंघटना किंवा जनवादी संस्थांच्या सोबत उभारायची; त्यासाठी पाड्यातील लोकांनी निवडलेल्या स्त्रियांना आरोग्य साथी म्हणून प्रशिक्षण द्यायचे; या कामामुळे या डोंगर-दऱ्यातील ग्रामीण, आदिवासी कष्टकऱ्यांचे दरवर्षी लाखों रुपये वाचले आहेत. वेळेवर व पाड्यातच उपचार मिळाल्यामुळे होणारी सोय, टळणाऱ्या गुंतागुंती, लोकांना त्यांच्याच बोली भाषेत मिळणारी माहिती असे फायदेही कमी महत्त्वाचे नाहीत. या पद्धतीने ठाणे जिल्ह्यात डहाणू-जव्हारच्या आदिवासी भागात कष्टकरी संघटना, कोल्हापूर जिल्ह्यात आजरा भागात श्रमिक मुक्ती दल, मध्य प्रदेशात बड़वानी जिल्ह्यात सेंधवा भागात आदिवासी मुक्ती संगठन व पाटी भागात जागृत आदिवासी दलित संगठन यांच्या सोबत १९९८ पासून आरोग्य साथी हा पथदर्शी कार्यक्रम संयुक्तपणे राबवला गेला व त्यातून जन संघटना व साथी यांच्यातील सहकार्याचा एक नवा पायंडाही पाडला गेला.

● आदिवासी जिल्ह्यांसाठीच्या महाराष्ट्र सरकारच्या नवसंजीवनी योजनेतील काही महिला पाडा-स्वयंसेवकांना डहाणू भागात प्रशिक्षण देण्याच्या प्रयोगातून एका वर्षातच हजारो आजारी व्यक्तींवर पाड्यातच, वेळेवर मोफत उपचार झाले. (या आरोग्य साथींसाठीच्या 'ग्रामीण आरोग्य कार्यकर्ता प्रशिक्षण' या अभ्यासक्रमाला मुंबईच्या एस.एन.डी.टी. विद्यापीठाची मान्यता मिळाली आहे.)

**आरोग्य हक्कांसाठी ॲडव्होकसी व प्रशिक्षण**

- इंजेक्शन आणि सलाईन यांचा दुरूपयोग, रक्तपांढरी, स्त्रियांचे खास आरोग्य प्रश्न, आरोग्य सेवेचा हक्क इत्यादी प्रश्नांबाबत जन जागृतीचे काम झाले. ग्रामीण आरोग्य कार्यकर्त्यांमार्फत झालेल्या आरोग्य हक्कांबाबतच्या या जन जागृतीचा आरोग्य सेवा सुधारण्याच्या कामात पाया म्हणून उपयोग झाला.
- प्राथमिक आरोग्य केंद्रे व ग्रामीण रुग्णालये यांच्यामार्फत मिळणाऱ्या सेवांमध्ये सुधारणा व्हावी यासाठी 'आरोग्य संवाद' असे परस्पर चर्चेचे कार्यक्रम या पासून ते मोर्चा, धरणे असे कार्यक्रम वर नमूद केलेल्या संघटनांनी 'साथी' च्या सहकार्याने घेतले. या अनुभवाच्या आधारे आरोग्य सेवेबाबत हक्काधारित दृष्टिकोण रुजवण्यासाठी निरनिराळ्या संस्था-संघटनांतील कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण करण्याचे काम २००५ पासून साथी करत आहे. हक्काधारित दृष्टिकोणाबद्दलच्या 'साथी' च्या वैशिष्ट्यपूर्ण भूमिकेतून लिहलेले प्रशिक्षण साहित्य तयार झाले आहे.
- 'जन स्वास्थ्य अभियान' हे आरोग्य चळवळीचे व्यापक व्यासपीठ भारतात २००० पासून उभे राहिले आहे. सार्वजनिक आरोग्य सेवांमध्ये सुधारणा व काही महत्त्वाच्या आरोग्य-प्रश्नांबाबत जन जागृती यासाठी जन स्वास्थ्य अभियान काम करते. आरोग्य सेवा हा मानवी अधिकार आहे या भूमिकेतून चालवल्या जाणाऱ्या या अभियानात पुढाकार घेणाऱ्यांपैकी 'साथी' आहे. सार्वजनिक आरोग्य सेवांच्या खराब स्थितीकडे लक्ष वेधणाऱ्या 'जन सुनवाया' या अभियानामार्फत आयोजित करण्यात आल्या. त्यात एक आघाडीचा संच म्हणून साथी ने काम केले.एप्रिल २००५ पासून सुरु झालेल्या केंद्र सरकारच्या 'राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य मिशन' मध्ये जनवादी तरतुदी सुचवणे व रेटणे या 'जन स्वास्थ्य अभियान' च्या कामात व जन स्वास्थ्य अभियानच्या राष्ट्रीय संयोजन समितीत 'साथी' चा पुढाकार राहिला आहे. तसेच 'बॉंबे नर्सिंग होम रेग्युलेशन ॲक्ट १९४९' मध्ये सुधारणा करणे; त्यात रुग्णालयांना काही किमान दर्जा ठेवण्याचे बंधनकारक ठेवणे; काही किमान रुग्ण हक्कांचा त्यात समावेश करणे यासाठी महाराष्ट्रात जनमताचा दबाव करण्याच्या जन आरोग्य अभियानच्या यशस्वी कामात 'साथी' चा पुढाकार राहिला आहे. मे २००३ पासून जन स्वास्थ्य अभियानच्या राष्ट्रीय सचिवालयाची (National Secretariat) मुख्य जबाबदारी साथी सांभाळत आहे. महाराष्ट्रातील जन-आरोग्य अभियानच्या सहसंयोजनाची जबाबदारीही जानेवारी २००३ पासून साथी कडे आहे.

**संशोधन व प्रकाशने**

साथी चमूने आपल्या कामाशी निगडित असे संशोधन केले आहे. ग्रामीण आरोग्य सेवांची स्थिती, आरोग्य सेवेतील विषमता, भूकबळींचा प्रश्न इत्यादी बाबत कृति-संशोधनही निरनिराळ्या संघटना-संस्था सोबत संयुक्तपणे साथी चमू वरील कामाला पूरक म्हणून करत आला आहे.

कमी शिकलेल्या किंवा निरक्षर स्त्रियांना 'आरोग्य साथी' म्हणून प्रशिक्षित करण्यासाठी मुख्यतः चित्ररुपातील आरोग्य-साथी भाग १, भाग २ ही दोन प्रशिक्षण पुस्तके (हिंदी भाषांतर - स्वास्थ्य साथी भाग १, व भाग २) महाराष्ट्रात व भारतात नावाजली गेली कारण अशा स्वरुपातील भारतातील ही पहिलीच पुस्तके होती.आरोग्य साथींसाठी मराठी व हिंदीमधे बनवलेले हे व इतर प्रशिक्षण साहित्य व आरोग्य जागृतीसाठीचे साहित्य (पुस्तिका, पुस्तके, प्रदर्शने, पोस्टर्स, स्लाईड-शो इ.) साथी ने प्रसिद्ध केले आहे व ते महाराष्ट्रात व देशात वाखाणले गेले आहे.

या सर्व कामाच्या आधारे साथी ने महाराष्ट्रात व देशातही संबंधितांचा विश्वास कमावला आहे.

# करु आरोग्याची साथ!

## भाग - 2

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

ISBN-81-89042-39-4